स्पर्धेचे स्वागत, मात्र कायदे सर्वांसाठी सारखेच - रिलायन्स

मस्क यांच्या 'स्टारलिंक' वादावर थेट टिप्पणी

पीटीआय, नवी दिल्ली

भारतातील उपग्रहाधारित इंटरनेट सेवांच्या बाजारपेठेत स्पर्धेचे स्वागत आहे; मात्र रिलायन्ससह प्रत्येक कंपनीला देशातील कायदे आणि धोरणांचे पालन करावेच लागेल, अशी स्पष्ट भूमिका रिलायन्स इंडस्ट्रीजने शुक्रवारी मांडली. इलॉन मस्क यांनी भारताच्या बाजारपेठेतील स्पर्धा आणि नियामक प्रक्रियेवर केलेल्या टीकेला यातून रिलायन्सने प्रथमच थेट उत्तर दिले आहे.

स्टारलिंकसह कोणत्याही कंपनीच्या स्पर्धेला आपला विरोध नसल्याचे सांगतानाच, जिओच्या उपग्रह सेवांची नियामक मंजुरीची प्रतीक्षा असल्याचे रिलायन्सकडून स्पष्ट करण्यात आले.

'रिलायन्सने कधीही स्पर्धेची भीती बाळगलेली नाही. ग्राहकांना सर्वोत्तम सेवा कोण देतो, याची खरी कसोटी म्हणजे स्पर्धा', असे कंपनीने निवेदनात म्हटले आहे. भारतातील उपग्रहाधारित दूरसंचार सेवांच्या क्षेत्रात मस्क यांच्या 'स्टारलिंक'सह अन्य कंपन्यांचे स्वागत असल्याचेही रिलायन्सने नमूद केले. मात्र, प्रत्येक कंपनीने नागरिकांना सेवा देताना भारतातील कायदे आणि धोरणांचे पालन करणे आवश्यक असल्याचे तिने बजावले आहे. देशांतर्गत असो वा आंतरराष्ट्रीय, लोकांचे जीवनमान उंचावणाऱ्या गुंतवणुकीचे आणि नवकल्पनांचे भारताने नेहमीच स्वागत केले आहे. मात्र, या खुलेपणाचा पाया हा 'कायद्याचे राज्य' हेच आहे, असे रिलायन्सने स्पष्ट केले. भारतीय किंवा परदेशी अशा सर्व अर्जदारांसाठी सरकार एकसमान प्रक्रिया राबवत असल्याचीही कंपनीने नमूद केले.

जिओच्या कामगिरीचा दाखला

रिलायन्सने जिओच्या दूरसंचार क्षेत्रातील प्रवासाचा दाखला कंपनीने दिला. २०१६ मध्ये जिओने भारतीय दूरसंचार बाजारपेठेत प्रवेश केला, तेव्हा कंपनीकडे एकही ग्राहक नव्हता. अवघ्या दहा वर्षांत ५३ कोटींहून अधिक ग्राहकांचा विश्वास संपादन करण्यात जिओला यश आले. देशातील नागरिकांना जागतिक स्तरावरील डिजिटल पायाभूत सुविधा आणि परवडणाऱ्या दरात इंटरनेट उपलब्ध करून दिल्याचे कंपनीने म्हटले आहे.

स्टारलिंकच्या प्रवेशावरून वाद

जगातील सर्वाधिक श्रीमंत व्यक्तींमध्ये गणना होणाऱ्या इलॉन मस्क यांनी अलीकडेच समाजमाध्यमांद्वारे भारताविरोधात उघड रोष व्यक्त केला आहे. रिलायन्स इंडस्ट्रीजचे अध्यक्ष मुकेश अंबानी यांना उपरोधिकपणे 'पंतप्रधान अंबानी' असे संबोधत, भारतातील निर्णयप्रक्रियेवर त्यांचा प्रभाव पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यापेक्षा अधिक आहे का, असा सवाली मस्क यांनी उपस्थित केला होता. भारतीय ग्राहकांवरील मक्तेदारीसदृश पकड कायम ठेवण्याचा काही उद्योगसमूहांचा प्रयत्न असल्याचा मस्क यांचा आरोप आहे.

एअरटेलकडूनही परवानगीच्या प्रक्रियेवर भाष्य

भारती एअरटेलचे अध्यक्ष सुनील मित्तल यांनीही या वादात उडी घेतली आहे. एअरटेलच्या सहयोगाने कार्यरत असलेली 'युटेलसॅट वनवेब' ही कंपनी भारतात सेवा सुरू करण्याच्या परवानगीच्या प्रक्रियेत 'स्टारलिंक'च्या तुलनेत पुढे असल्याचे ते म्हणाले.

आयडीबीआय बँकेच्या कर्मचारी-निवृत्तिवेतनधारकांच्या सेवाशर्ती सुरक्षित

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

आयडीबीआय बँकेच्या निर्गुंतवणुकीनंतरही बँकेतील सध्याचे कर्मचारी आणि निवृत्तिवेतनधारकांच्या सेवाशर्तींमध्ये कोणताही बदल होणार नाही, अशी माहिती गुंतवणूक आणि सार्वजनिक मालमत्ता व्यवस्थापन विभाग अर्थात 'दीपम'चे सचिव अरुणीश चावला यांनी शुक्रवारी दिली. बँकेच्या खासगीकरणामुळे कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्तींवर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात असताना हा खुलासा आश्वासक ठरणारा आहे.

कॅनडाच्या 'फेअरफॅक्स फायनान्शियल होल्डिंग्ज'च्या उपकंपनीला ५२,७८८ कोटी रुपयांना (सुमारे ५.५६ अब्ज डॉलर) आयडीबीआय बँकेतील ६०.७२ टक्के मालकी हक्क विकण्याच्या व्यवहाराला केंद्रीय मंत्रिमंडळाने बुधवारी मंजुरी दिली. त्यांनी या संबंधाने झालेल्या 'समभाग खरेदी करारां'तर्गत, सध्याच्या कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्ती कायम ठेवण्यास मान्यता दिली आहे. त्यामुळे सध्या कार्यरत असणारे कर्मचारी आणि निवृत्तिवेतनधारक यांनी कोणतीही भीती बाळगण्याचे कारण नाही, असे चावला यांनी सांगितले.

आयडीबीआय बँकेच्या मालकीतील बदल आणि पुनर्रचनेबाबत चावला म्हणाले की, सध्याच्या निवृत्तिवेतनधारकांसाठी स्वतंत्र 'पेन्शन फंड' स्थापन करण्यात आला असून तो कायम ठेवला जाईल. तसेच सध्याच्या कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्ती आणि पेन्शन लाभांबाबतच्या सर्व अटी या फेअरफॅक्सच्या उपकंपनीबरोबर झालेल्या करारात स्पष्टपणे समाविष्ट करण्यात आल्या आहेत.

दरम्यान, रिझर्व्ह बँककडून मंजुरीची मोहोर उमटल्यावर, आयडीबीआय बँकेच्या खासगीकरणाची प्रक्रिया मार्च २०२७ अखेर पूर्ण होणार असल्याची अपेक्षा आहे. यशस्वी बोलीदार या नात्याने फेअरफॅक्सच्या उपकंपनीला रिझर्व्ह बँककडे तांत्रिक कागदपत्रे सादर करावी लागतील आणि अतिरिक्त अनुपालन व नियामक आवश्यकता पूर्ण करण्यासाठी आवश्यक तपशीलांसह पात्रता सिद्ध करावी लागेल. रिझर्व्ह बँकेची मंजुरी मिळाल्यानंतर समभाग खरेदी-विक्री कराराचा प्रक्रिया होईल त्यानंतर आर्थिक वर्ष संपण्यापूर्वी व्यवहार पूर्ण करण्याचा मार्ग मोकळा होईल, असे चावला यांनी सांगितले.

किरकोळ भागधारकांचे हितरक्षण

या व्यवहारात किरकोळ भागधारकांच्या हिताचे पूर्ण संरक्षण केले जाईल, अशी ग्वाही चावला यांनी दिली. समभाग खरेदी-विक्री करार झाल्यानंतर धोरणात्मक खरेदीदाराला नियमानुसार किरकोळ भागधारकांसाठी समभाग खरेदीचा प्रस्ताव (ओपन ऑफर) खुला करावा लागेल. त्यामुळे या भागधारकांना निर्धारित नियमांनुसार समभाग विकण्याची संधी मिळेल.

आयटी क्षेत्रातील तेजीने 'सेन्सेक्स'ची चार शतकी मजल

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी

मुंबई: जागतिक भांडवली बाजारातील सकारात्मक कल आणि माहिती-तंत्रज्ञान (आयटी) समभागांमधील जोरदार खरेदीच्या जोरावर शुक्रवारी सेन्सेक्स आणि निफ्टी हे प्रमुख निर्देशांक सलग दुसऱ्या दिवशी तेजीसह बंद झाले. सेन्सेक्स ४१३.६६ अंशांनी वधारून ७४,७२९.२७ पातळीवर स्थिरावला. व्यवहारादरम्यान त्याने ४६३.१७ अंशांची वाढ नोंदवून ७४,७७८.७८ अंशांची उच्चांकी पातळी गाठली. निफ्टी १४८.८० अंशांनी २३,१४६.१५ वर बंद झाला. बाजार नियामक 'सेबी'ने गुरुवारी 'क्लोजिंग ऑक्शन सेशन'च्या (कॅस) आराखड्यात सुधारणा केली.

IDEMI
GOVERNMENT OF INDIA
Ministry of Micro, Small and Medium Enterprises
INSTITUTE FOR DESIGN OF ELECTRICAL MEASURING INSTRUMENTS, MUMBAI
वैद्युतिक मापन उपयंत्र अभिकल्प संस्थान, मुंबई
Government Certificate Course on
SOLAR ROOFTOP INSTALLATION
२ दिवसीय व्यवसायिक प्रशिक्षण कार्यक्रम
Date- 24 & 25 Oct 2026 Time-10.00 Am to 5.00 PM
Venue : IDEMI, Bhaktidham Mandir road, Near Everard nagar bus stop Chunabhatti (E), Sion, Mumbai-400022
E-mail-dnd@idemi.org Web:. www.idemi.org Ph.: (022) 2405 0301/2/3/4
DEMO ON 5 KW ROOFTOP SOLAR SYSTEM
Contents : Solar basics, Solar system components, Installation techniques, Selection of materials, case study, Off-grid and On-grid solar system
अभ्यासक्रम शुल्क रु.4500 + 18% GST (Fees are not refundable) QR CODE FOR REGISTRATION
(अल्पोपहार व भोजन समाविष्ट)
For Whom : Engineers, Architect, Budding Entrepreneurs Students, Other Interested candidates.
हमें कॉल करें / Call us between 10 am to 6 pm
Contact-9833292670,9819495547,8669056225
Documents required: Aadhar card xerox, Education documents, 2 Passport Photograph

हवी अर्थशक्तीची जोड!

CANARA ROBECO Mutual Fund प्रस्तुत लोकसत्ता अर्थभान

कॅनरा रोबेको म्युच्युअल फंड प्रस्तुत 'लोकसत्ता अर्थभान' उपक्रमांतर्गत 'आदिशक्तीला हवी अर्थशक्तीची जोड!' या संकल्पनेतून वाशी येथील आर्य समाज हॉलमध्ये महिलांसाठी विनामूल्य गुंतवणूक मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले होते. आर्थिक उद्दिष्टानुरूप गुंतवणुकीची आखणी करण्यासह, जोखीम आणि परतावा यांचा समतोल साधून दीर्घकालीन संपत्तीनिर्मिती कशी करता येते, हे आर्थिक नियोजनकार कौस्तुभ जोशी यांनी 'गुंतवणुकीतून अर्थनियोजन' या विषयावर मार्गदर्शन करताना स्पष्ट केले. कॅनरा रोबेको म्युच्युअल फंडाचे बिझनेस हेड गोविंद गवस यांनी आर्थिक साक्षरतेचे महत्त्व अधोरेखित करत आर्थिक निर्णय सजगपणे घेण्याविषयी मार्गदर्शन केले. या सत्राला गुंतवणुकीसाठी उत्सुक महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. महिलांना आर्थिक नियोजनाची योग्य दिशा मिळावी आणि त्यांचा गुंतवणुकीविषयीचा आत्मविश्वास वाढावा, हा या सत्राचा मुख्य उद्देश होता. सुनील वालावलकर यांनी श्रोते आणि वक्ते यांच्यातील दुवा म्हणून भूमिका पार पाडली. कार्यक्रमाचे मुख्य प्रायोजक कॅनरा रोबेको म्युच्युअल फंड, तर 'वी मुक्ता' ही इव्हेंट पार्टनर होती.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग (उपाहारगृहे),
एम-१०, मंत्रालय उपाहारगृहे कार्यालय,
विस्तार इमारत, पोटमाळा, मंत्रालय, मुंबई-४०००३२
क्रमांक : निविदा-२०२५/प्र.क्र.२९३/२५/मंउका, दिनांक - १५/१०/२०२६
ई-निविदा सूचना (द्वितीय व अंतिम मुदतवाढ)
मंत्रालय उपाहारगृह कार्यालयाच्या दिनांक २४/९/२०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या ई-निविदा क्रमांक Tender ID-2026-MC-1341277-4, 2026-MC-1341277-5, 2026-MC-1341277-6 यांना दिनांक २२/१०/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत प्रथम मुदतवाढ देण्यात येत आहे.
२. निविदेसंदर्भात अधिक माहिती आवश्यक असल्यास कार्यालयीन वेळेत दूरध्वनी क्रमांक ०२२-२२७९३००१/९८६७०५९९१२ अथवा email-ulhas.kesarkar@nic.in संपर्क साधण्यात यावा.
महाव्यवस्थापक,
मंत्रालय उपाहारगृहे.
डीजीआयपीआर/२०२६-२७/५/सी३२८५

एम एम आर डी ए MMRDA
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)
७ वा मजला, परिवहन व दळणवळण विभाग,वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई -४०००५१,
दुरध्वनी क्र. ०२२-६५९६७५११ / ७५५६, फॅक्स - २६५९४१३९
ई-मेल: siddharth.gondhale@mailmmrda.maharashtra.gov.in वेबसाईट: https://mmrda.maharashtra.gov.in
ई-निविदा सूचना

अ. क्र.	कामाचे स्वरूप	कोऱ्या ई-निविदांची किंमत (रु.)	ई-निविद डाउनलोड करण्याचा कालावधी तारीख/वेळ (पासून)	तारीख/वेळ (पर्यंत)	निविदा स्विकारण्याची अंतिम तारीख	कामाचा कालावधी
१)	मुंबई मेट्रो मार्ग-६ वरील मेट्रो स्थानकावर, विक्रोळी मेट्रो स्थानक आणि कांजूरमार्ग रेल्वे स्थानक यांना जोडणाऱ्या पादचारी पुलाच्या (Foot Over Bridge) बांधकामासाठी कंत्राटदाराची नियुक्ती - भाग 'अ'	₹ ५०००/- + (१८% वस्तू व सेवा कर)	१७/१०/२०२६ (१८:०१ वा. पासून)	१२/११/२०२६ (१८.०० वा. पर्यंत)	१२/११/२०२६ (१८.०० वा. पर्यंत)	२४ महिने (पावसाळा कालावधी सह) + ६० महिने दोष दायित्व कालवधी (डी.एल.पी)
२)	मुंबई मेट्रो मार्ग-६ वरील मेट्रो स्थानकावर, जोगेश्वरी मेट्रो स्थानक आणि जोगेश्वरी रेल्वे स्थानक यांना जोडणाऱ्या पादचारी पुलाच्या (Foot Over Bridge) बांधकामासाठी कंत्राटदाराची नियुक्ती - भाग 'ब'					

टिप: ई-निविदा प्रपत्रे, शुध्दीपत्रक, इतर माहिती **https://mahatenders.gov.in/nicgep/app** या संकेतस्थळावरून डाउनलोड करता येईल. ई-निविदा संबंधीत सविस्तर माहिती आणि मदतीसाठी **support-eproc@nic.in, mahatender@mailmmrda.maharashtra.gov.in** या ई-मेल किंवा दूरध्वनी क्र. ०२२-६५९६७५११ / ७५५६ शी संपर्क साधावा.
दिनांक :- १७.१०.२०२६
ठिकाण :- वांद्रे (पूर्व), मुंबई.
स्वाक्षरी/-
मुख्य (अ.का.) परिवहन दळणवळण विभाग

'गोल्ड फंड ऑफ फंड्स'मधील नवीन गुंतवणुकीवर तात्पुरती स्थगिती

पीटीआय, नवी दिल्ली

एसबीआय म्युच्युअल फंड, एचडीएफसी म्युच्युअल फंड, आयसीआयसीआय प्रुडेन्शियल म्युच्युअल फंड आणि कोटक म्युच्युअल फंड यांसारख्या डझनाहून अधिक म्युच्युअल फंड कंपन्यांनी, या शुक्रवारपासून 'गोल्ड फंड ऑफ फंड्स'मधील नवीन गुंतवणुकीवर तात्पुरती स्थगिती लागू केली आहे. १६ ऑक्टोबरपासून लागू झालेला हा निर्णय पुढील सूचना मिळेपर्यंत कायम राहणार आहे.

'गोल्ड फंड ऑफ फंड्स' या अशा योजना आहेत ज्या प्रत्यक्ष सोने खरेदी करण्याऐवजी 'गोल्ड एक्सचेंज ट्रेडेड फंडा'त गुंतवणूक करतात. या निर्बंधांमध्ये नवीन एकरकमी गुंतवणूक, 'स्विच-इन' व्यवहार, तसेच सिस्टिमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन (एसआयपी) आणि सिस्टिमॅटिक ट्रान्सफर प्लॅन (एसटीपी) यासाठी नवीन नोंदणी यांसारख्या सर्व प्रकारच्या नवीन गुंतवणुकींचा समावेश आहे. काही फंड घराण्यांनी हे निर्बंध 'गोल्ड-सिल्व्हर फंड ऑफ फंड्स'ना देखील लागू केले आहेत.

GOODS & SERVICES TAX DEPARTMENT
GOVERNMENT OF MAHARASHTRA
OFFICE OF THE ADDITIONAL COMMISSIONER OF STATE TAX, RAIGAD ZONE.
3rd Floor, Gate No.07, Rupa Renaissance, Plot No.D-31,Turbhe MIDC Road, Turbhe, Navi Mumbai - 400703.
"NOTICE INVITING E-TENDER FOR TOURIST VEHICLES"
The Additional Commissioner of State Tax, Raigad Zone, invites online bids through the e-Tendering system for the **hiring of operational tourist vehicles (Taxis with valid commercial permits) for the official use of its officers and staff deployed across Raigad Zone.** The contract shall be valid for a baseline duration of two **(2) years,** commencing from **16/11/2026.** The total primary requirement is 11 (Eleven only) vehicles.
The detailed tender documents can be downloaded from **16/10/2026 (04:00 PM) to 02/11/2026 (before 17:00 PM)** via the official Government e-Procurement portal: https://mahatenders.gov.in against a nonrefundable tender document fee payment of **1,000/- (Rupees One Thousand only).** All payments must be routed strictly through online payment pathways (Net Banking, Debit Card, Credit Card, or NEFT/RTGS).
Cryptographically sealed technical and commercial bids will be opened at the Office of the Additional Commissioner of State Tax Raigad Zone 3RD Floor, Gate No.07, Rupa Renaissance Plot No.D-1,Turbhe MIDC Road, Turbhe, Navi Mumbai-400703 on **04/11/2026 at 11:00 AM** in the presence of attending bidders or their designated authorized representatives. The competent authority reserves absolute rights to accept or reject any or all submitted bids without assigning any justification thereof.
Sd/-
Addl. Commissioner of Goods & Service Tax,
Raigad Zone, Turbhe Navi Mumbai.
DGIPR/2026-27/5/C/3292

आरोपी व्यक्तीची उपस्थिती आवश्यक असणारी उद्घोषणा
सेक्शन ८२ क्रिमि. पी.सी. / ८४ भारतीय न्याय संहिता, २०२३ पाहा
ज्याअर्थी, माझ्यासमोर तक्रार दाखल करण्यात आली आहे की, आरोपी व्यक्ती **सैफुल्लन अन्सारी उर्फ खलिद,** मोहम्मद अखलक **यांचे सुपुत्र, निवासी पत्ता :** फ्लॅट नं. ४, पहिला मजला, सी-विंग, शेरिआर बाग बिल्डिंग, जेजे हॉस्पिटलसमोर, गेट नं. २, पी.एस. डोंग्री, मुंबई, महाराष्ट्र याने **एफआयआर नं. ३९३/२०२६, सेक्शन ३१८/३१९/३३६/३४० अंतर्गत भारतीय न्याय संहिता, २०२३ व १२ पीपी ॲक्ट, पी.एस. : आयजीआय एअरपोर्ट, नवी दिल्ली** प्रकरणात गुन्हा केला आहे (किंवा गुन्हा केल्याचा संशय आहे) आणि त्यावर निर्गमित केलेला अरेस्ट वॉरंट परत आला आहे, असे की उक्त आरोपी **सैफुल्लन अन्सारी उर्फ खलिद** सापडणे शक्य नाही आणि ज्याअर्थी माझ्या समाधानार्थ असे दर्शविण्यात आले आहे की, उक्त आरोपी **सैफुल्लन अन्सारी उर्फ खलिद** फरार आहे (किंवा उक्त वॉरंट स्वीकारणे टाळण्याकरिता स्वतःला लपवत आहेत).
उद्घोषणा याद्वारा देण्यात आली की, **एफआयआर नं. ३९३/२०२६, सेक्शन ३१८/३१९/३३६/३४० अंतर्गत भारतीय न्याय संहिता, २०२३ व १२ पीपी ॲक्ट, पी.एस. : आयजीआय एअरपोर्ट, नवी दिल्ली** या प्रकरणातील उक्त आरोपी **सैफुल्लन अन्सारी उर्फ खलिद** याने १७.११.२०२६ रोजी किंवा तत्पूर्वी उक्त तक्रारीस उत्तर देण्याकरिता या न्यायालयासमोर उपस्थित राहणे आवश्यक आहे.
आदेशाद्वारा
श्री. अनिमेश भास्कर मणी त्रिपाठी
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी-०१
कोर्ट नं. २, पटियाला हाऊस कोर्ट, नवी दिल्ली
DP/14834/IGIA/2026
(Court Matter)

महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्या. पुणे (मेस्को)
दुसरा मजला, रायगड इमारत, घोरपडी, पुणे-४११००१
संपर्क : ०२०-२६३०२६५९, मो.नं.:- ९३७३१६४९६२
ई-मेल : contact@mescoltd.co.in
मेस्को वेब साईट : www.mescoltd.co.in
महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्या. पुणे (मेस्को) मध्ये भारतीय संरक्षण दलातून निवृत्त झालेल्या माजी सैनिक आणि अवलंबितांना खालील पदावर करार पध्दतीने नेमणुकीसाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविणेत येत आहेत:-

अ.क्र.	पदाचे नाव, पद संख्या व ठिकाण
१.	व्यवस्थापक - ०२ (i) मालाड - ०१ (ii) लातुर - ०१
२.	लिपिक - ०३ (i) मुंबई - ०१ (ii) पुणे - ०२
३.	मेस्को पर्यवेक्षक - ०१ (i) जालना - ०१

१. वरील पदांसाठीच्या अटी व शर्ती मेस्कोच्या www.mescoltd.co.in या वेबसाइटवर अपलोड केल्या आहेत.
२. ईच्छुक व पात्र उमेदवारांनी आपले अर्ज प्रत्यक्षरित्या किंवा ई मेल द्वारे मेस्कोच्या वेबसाइटवर दिलेल्या पत्त्यावर व ई-मेल वर पाठवावेत.
३. अर्ज प्राप्त होण्याची अंतिम तारीख **३० ऑक्टोबर २०२६.**
व्यवस्थापकीय संचालक, मेस्को, पुणे

तनिष्ककडून 'अध्यांतरा'च्या प्रस्तुतीसह दागिन्यांच्या श्रेणीचा विस्तार

मुंबई: टायटन कंपनीची प्रिमियम ज्वेलरी नाममुद्रा 'तनिष्क'ने आगामी सणासुदीच्या काळात दागिन्यांच्या बाजारपेठेतील मागणीत होणारी वाढ लक्षात घेऊन 'अध्यांतरा' ही नवीन दागिन्यांची श्रेणी प्रस्तुत केली आहे. या नव्या संग्रहणांतर्गत १८ आणि २२ कॅरेट सोन्यामधील १०० हून अधिक नवीन डिझाइन्स सादर करण्यात आल्या आहेत. यामध्ये ग्लास कुंदन, प्लेन गोल्ड, ॲक्सेंटेड जेमस्टोन्स आणि ओपन पोलकी अशा चार मुख्य वर्गवाऱ्यांमध्ये उत्पादने उपलब्ध आहेत. अभिनेत्री तृप्ती डिमरीच्या सहभागाने कंपनीने अलिकडेच या दागिन्यांच्या श्रेणीचे अनावरण केले.

BAJAJ HOUSING FINANCE
बजाज हाऊसिंग फायनान्स लिमिटेड
कॉर्पोरेट कार्यालय : सेरेब्रम आयटी पार्क, बी२ बिल्डिंग, ५वा मजला, कल्याणी नगर, पुणे-४११०१४, महाराष्ट्र.
शाखा कार्यालय : सेरेब्रम आयटी पार्क, बी२ बिल्डिंग, ५वा मजला, कल्याणी नगर, पुणे-४११०१४, महाराष्ट्र /४५१, ४था मजला, अग्गरवाल मिलेनियम टॉवर-१, नेताजी सुभाष पॅलेस, पितमपुरा, नवी दिल्ली - ११००३४. प्राधिकृत अधिकारीचा तपशील : नाव : आशिष माथूर/ ईमेल आयडी : ashish.mathur@bajajhousing.co.in, मोबा. नं. ९६६०१०३४६५/८५२७५३०९०९
स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता विक्री सूचना - परिशिष्ट-IV-A [रुल ८(६)]
सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या रुल ८(६) च्या तरतुदींसह वाचलेल्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ अंतर्गत स्थावर मत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना
सूचना याद्वारा आम जनतेस तसेच विशेषकरून ऋणको व हमीदारांना देण्यात आली आहे की, सुरक्षित धनकोकडे याखाली वर्णिलेली स्थावर मालमत्ता गहाण आहे / ताब्यात आहे, जिचा प्रत्यक्ष ताबा "बजाज हाऊसिंग फायनान्स लि." (सुरक्षित धनको) च्या प्राधिकृत अधिकारीद्वारा घेण्यात आला आहे, सदर स्थावर मालमत्तेची विक्री याखाली सविस्तरपणे दिल्यानुसार "बजाज हाऊसिंग फायनान्स लि."करिता देय असलेली कर्ज देणी, लागू व्याज, आकार व किंमत, इ. या रकमेच्या वसुलीकरिता "जसे आहे जेथे आहे, जसे आहे जे काही आहे आणि जे काही आहे तेथे आहे" आणि "कोणत्याही आधाराशिवाय" या तत्त्वावर करण्यात येणार आहे :

ऋणको / सह-ऋणको / हमीदारांचा तपशील आणि कर्ज तपशील	१. ई-लिलावाची तारीख व वेळ, २. इरठेच्या सादरीकरणाची शेवटची तारीख, ३. मालमत्तेच्या पाहाणीची तारीख व वेळ	१. राखीव किंमत २. मालमत्तेची इरठे ३. बोली वृद्धी
एलएएन : H580HNI1427181 १. श्री. धृव दत्त शर्मा (प्राथमिक ऋणको) पत्ता - ३२वा माईलस्टोन, सेक्टर-१५, पार्ट-२, गुरुग्राम, हरयाणा - १२२००१, २. श्री. अनुभव शर्मा (सह-ऋणको) पत्ता - ३२वा माईलस्टोन, सेक्टर-१५, पार्ट-२, गुरुग्राम, हरयाणा - १२२००१, ३. श्रीमती ममता शर्मा (सह-ऋणको) पत्ता - ३२वा माईलस्टोन, सेक्टर-१५, पार्ट-२, गुरुग्राम, हरयाणा - १२२००१, ४. श्री. शिरीन शर्मा (सह-ऋणको) पत्ता - ३२वा माईलस्टोन, सेक्टर-१५, पार्ट-२, गुरुग्राम, हरयाणा - १२२००१, थकीत देणी - रु. २०,१३,८०,००३/- (रुपये वीस कोटी तेरा लाख ऐंशी हजार तीन फक्त) १५/१०/२०२६ रोजीप्रमाणे व १५/१०/२०२६ च्या प्रभावापासून निघालेले पुढील व्याज व आकार यासह	१) ई-लिलावाची तारीख : १६/११/२०२६ रोजी स. ११.०० व दु. १२.०० दरम्यान ५ मिनिटांच्या अमर्यादित मिनिटांसह. २) केवायसी समवेत इरठेच्या सादरीकरणाची शेवटची तारीख : १५/११/२०२६ रोजी सायं. ०५.०० वा. पर्यंत (भाप्रवे) ३) पाहाणीची तारीख : १७/१०/२०२६ ते १५/११/२०२६ स. ११.०० व दु. ०४.०० दरम्यान (भाप्रवे)	१. राखीव किंमत : रु. २५,००,००,०००/- (रुपये पंचवीस कोटी फक्त) २. इरठे : रु. २,५०,००,०००/- (रुपये दोन कोटी पन्नास लाख फक्त) राखीव किमतीच्या १०% ३. बोली वृद्धी : रु. १,००,०००/- (रुपये एक लाख फक्त) व सदर पटीत.

स्थावर मालमत्तेचे वर्णन : पुढील जमीन मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे - जमिनीचा मोजमापाचा एरिआ १८०५ चौ.मी., हाऊस धारण केलेला हाऊस नंबर ५१६ यासह, **"ताम्ब्रुक"** किंवा **"ताम्बुडूगक्यू"** म्हणून ज्ञात असलेल्या मोठ्या मालमत्तेपैकी, येथे स्थित - व्हिलेज अंजूना, व्हिलेज पंचायत अंजूनाच्या मर्यादेत, तालुका व उप जिल्हा बार्डेझ, जिल्हा उत्तर गोवा, गोवा राज्यातील, बुक बी-५२ च्या नं. २०३५६ अंतर्गत जमीन नोंदणी कार्यालयात नोंदणीकृत आणि चौथ्या विभागाच्या नं. १५६ अंतर्गत महसूल कार्यालयात नोंदणीकृत आणि नं. ५९६/४ अंतर्गत हक्कांच्या रेकॉर्ड्सकरिता सर्वेक्षण केलेले. सीमा : पूर्वेच्या दिशेने : मालमत्ता धारण केलेला सर्व्हे नं. ५९६/६ जोआओ मोंटेरो व बनार्डो डीसोझा यांच्या मूळ मालकीची, पश्चिमेच्या दिशेने : हॉटेल स्टर्लिंग रिसॉर्टचा मालमत्ता धारण केलेला सर्व्हे नं. ५९६/१, उत्तरेच्या दिशेने : पावसाचे पाणी वाहून नेणारी नाला व दक्षिणेच्या दिशेने : मालमत्ता धारण केलेला सर्व्हे नं. ३४१ व ३४२/१, फिलिप नेरी पॅट्रिसिओ डिसोझा व सँटन डीसोझा / गव्हर्मेंटच्या मूळ मालकीची.
जाहीर लिलावाच्या शर्ती व अटी पुढीलप्रमाणे आहेत :
● सुरक्षित मत्तेची विक्री राखीव किमतीच्या खाली केली जाणार नाही. ● **लिलाव विक्रीचे आयोजन ई-लिलाव पोर्टलमार्फत ऑनलाइन करण्यात येणार आहे. ई-लिलावाचे आयोजन प्रत्येकी ५ मिनिटांच्या अमर्यादित स्वयं-विस्तारासह १६.११.२०२६ रोजी स. ११:०० व दु. १२:०० दरम्यान https://bankauctions.in या पोर्टलद्वारा करण्यात येणार आहे.** ● सविस्तर शर्ती व अटींकरिता, कृपया URL - **https://www.bajajhousingfinance.in/auction-notices** या कंपनीच्या वेबसाइटला भेट द्यावी किंवा कोणत्याही स्पष्टिकरणाकरिता, कृपया प्राधिकृत अधिकारींशी संपर्क साधावा.
दिनांक : १५.१०.२०२६
स्थळ : दिल्ली / गोवा / मुंबई
प्राधिकृत अधिकारी (आशिष माथूर)
बजाज हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

केनरा बैंक Canara Bank | सिंडिकेट Syndicate
BOBCAPS TRUST | INNOVATION | EXCELLENCE (A wholly owned subsidiary of Bank of Baroda)
ADVERTISEMENT INVITING EXPRESSION OF INTEREST ("EOI") FOR TRANSFER OF STRESSED LOAN EXPOSURE IN THE ACCOUNTS OF M/s. CARNIVAL TECHNO PARK PRIVATE LIMITED TO PERMITTED TRANSFEREES THROUGH THE SWISS CHALLENGE METHOD
BOB Capital Markets Limited ("BOBCAPS" or "Process Advisor") has been mandated by Canara Bank ("CB" or "Bank" or "Lender") for assisting and advising the Bank on the bid process and matters incidental thereto in connection with the assignment of debt/ financial assets arising out of such debts of **M/s. Carnival Techno Park Private Limited** (collectively referred to as **"CTPL"**) through Swiss Challenge Method to the Permitted Entities/Transferees and ARCs in accordance with the regulatory guidelines issued by Reserve Bank of India ("RBI"), including but not limited to the RBI (Commercial Banks – Transfer and Distribution of Credit Risk) Directions, 2025 (the "RBI Directions") and as amended from time to time and approved by the Bank's internal board.
CTPL has availed debts from Canara Bank having outstanding amount of **Rs 167.22 crore** as on **15.10.2026.** BOBCAPS, on behalf of CB invites Expressions of Interest **("EOI")** from the Permitted Entities/Transferees and ARCs under the RBI Directions, to acquire the debt/ financial assets arising out of such debt of CTPL along with underlying security through assignment. The Bank is proposing to undertake a Swiss Challenge Method on "All Cash" basis. Transfer of debt with underlying assets via assignment shall be on "As is where is", "As is what is", "As is how is", "Whatever there is" and "Without recourse" basis, without any representation, warranty or indemnity by the Bank, based on existing offer in hand ("Anchor Bid"). Considering that the auction is under the "Swiss Challenge Method" on the Anchor Bid, the Anchor Bidder shall have specific preferential rights as set out in the Bid Process Document ("BPD") and further have the right to match the highest bid under Right of First Refusal ("ROFR").
BOBCAPS, on behalf of the Bank, hereby invites Expressions of Interest ("EOI") for assignment of debt/ financial assets arising out of such debts in the accounts of CTPL.

Last Date for submission of EOI along with RPF	October 22, 2026 by 05:00 PM
Access to Virtual Data Room for Due Diligence	October 22, 2026 to November 5, 2026 till 05:00 PM
Offer in Hand from Anchor Bidder	INR 117.00 Crore (Rupees One Hundred and Seventeen Crore only)
Refundable Participation Fee (RPF) to be deposited along with EOI to get VDR access.	INR 11.70 Crore (Rupees Eleven Crore and Seventy Lakhs only)
Minimum Markup @ 5.00% of Anchor Bid	INR 5.85 Crore (Rupees Five Crore and Eighty Five Lakhs Only)
Bidding Start Price	INR 122.85 Crore (Rupees One Hundred and Twenty Two Crore and Eighty Five Lakhs only)
Bid Increment Amount (Bid Multiplier)	Minimum of INR 1.00 Crore (Rupees One Crore only) & in multiples thereof

For detailed information, interested bidders may visit the Process Advisor's website at **www.bobcaps.in/tenders** and also at the Bank's website at **www.canarabank.bank.in/tenders.** In case of any clarifications, please contact the following:

Contact Person	Tel. No.	Email ID
Mr. Rakesh Chandra Shandilya – AGM, CB	+91 6364917101	cb15550@canarabank.com
Mr. Wasim Shaikh, AVP – BOBCAPS	+91 8976771242	projectpark@bobcaps.in
Mr. Hemant Gupta, SM – BOBCAPS	+91 9819436276	

Note: Please note that the bid process as envisaged in this advertisement shall be subject to final approval of the Competent Authority of the Bank. CB/BOBCAPS (on instructions of the Bank) reserves the right to cancel or modify the bid process and/or disqualify any shortlisted eligible bidders without assigning any reason and without any liability. This is not an offer document and nothing contained herein shall constitute a binding offer or a commitment to sell any debt/asset. Applicants should regularly visit the above websites to keep themselves updated regarding clarifications/ amendments/ time-extensions, if any. The Bank reserves the right to amend and/or annul this invitation including any timelines or the process therein, at any time, without giving or assigning any reasons or assuming any liability or costs. Any such amendment shall be available on the above websites/ Virtual Data Room or shared through email with shortlisted eligible bidders. BOBCAPS or the Bank shall not be held liable for any failure on part of the shortlisted eligible bidders to keep themselves updated of such modifications.
Place: Mumbai
Date: October 17, 2026
Sd/-
Issued by BOBCAPS, Process Advisor on behalf of Canara Bank, SAMB, Mumbai

JAIPUR DEVELOPMENT AUTHORITY
Indira Circle, Jawahar Lal Nehru Marg, Jaipur-302
No.: JDA/EE & TA to Dir. Engg.-I/2026-27/D- Date : 16.10.2026
NOTICE INVITING BID
NIB No. : EE & TA to Dir. Engg.-I/23/2026-27
Bids are invited from interested bidders for following works :-

S. No.	UBN No.	Cost of Work (Lacs)	Nature of Work	Last Date
1	JDA2627WSOB00366	339.69	Electrical Work	02.11.2026
2	JDA2627WLOB00374	4165.38	Construction of Underpass	04.11.2026
3	JDA2627WSOB00380	270.32	Construction of Footpath	04.11.2026
4	JDA2627WLOB00382	820.98	Road Work	06.11.2026
5	JDA2627WLOB00384	1688.30	Holistic Development Work	06.11.2026

Other particulars of the respective bid may be visited on Procurement Portal website www.sppp.rajasthan.gov.in, www.eproc.rajasthan.gov.in and www.jda.rajasthan.gov.in
Executive Engineer & TA to Dir. Engg-I
Raj.Samwad/C/26/12129